# जिल्हा परिषद वर्धा,सामान्य प्रशासन विभाग

# जाहिर प्रकटन

ग्राम विकास विभागांतर्गत गट-क (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळुन) जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती सन-२०२३ अन्वये जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत 'वरिष्ठ सहाय्यक (लेखा) ,दोरखंडवाला, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), विस्तार अधिकारी (कृषी),आरोग्य पर्यवेक्षक तसेच तारतंत्री ' या सहा संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता घेणेत आलेल्या ऑनलाईन परिक्षेचे गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवुन तात्पुरती निवड यादी जिल्हा परिषद,वर्धा चे संकेतस्थळ www.zpwardha.in वर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

प्रसिद्ध करणेत आलेल्या जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत 'वरिष्ठ सहाय्यक (लेखा) ,दोरखंडवाला, विस्तार अधिकारी (सांख्यिकी),विस्तार अधिकारी (कृषी),आरोग्य पर्यवेक्षक तसेच तारतंत्री ' या सहा संवर्गातील घोषित रिक्त पदांकरीताचे उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता **दिनांक २० फेब्रुवारी,२०२४ (मंगळवार) रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा परिषद,वर्धा येथे आयोजन करणेत आलेले आहे.** त्यानुसार मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व मूळ दस्तऐवज सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबत जोडणेत आली आहे. त्यानुसार आपण नमुद मूळ आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज व त्यांची ०२ स्वाक्षांकित प्रतीसह **दिनांक २० फेब्रुवारी,२०२४ (मंगळवार) रोजी सकाळी १०.०० वाजता स्व.सिंधुताई सपकाळ सभागृह,जिल्हा परिषद,वर्धा** येथे न चुकता उपस्थित राहावे.

आय.बी.पी.एस. (I.B.P.S.) कंपनीकडुन प्राप्त संयुक्त गुणानुक्रमे यादयानुसार वरील संवर्गातील प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे यादीनुसार उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करीता बोलविण्यांत येत असलेल्या यादीमध्ये समावेश असणाऱ्या व कागदपत्रे पडताळणीकरीता पाचारण करणेत आलेल्या उमेदवारास अंतिम निवडीचा कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. **तसेच उक्त दिनांक २० फेब्रुवारी,२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता कागदपत्रे /दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी.** कागदपत्रे पडताळणीकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. कागदपत्रे पडताळणी अंती अंतिम निवड/प्रतिक्षा यादी जिल्हा निवड समिती तथा मा. जिल्हाधिकारी,वर्धा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समितीचे मान्यतेनंतर जिल्हा परिषदेच्या www.zpwardha.in या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यांत येईल.

दिनांक : 12.02.2024

| | | |
|---|---|---|
| (अमोल ज.भोसले)<br>सदस्य-सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),<br>जिल्हा परिषद, वर्धा | (विश्वास सिद)<br>सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, वर्धा | (राहुल कर्डिले,भा.प्र.से.)<br>अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी,वर्धा |